प्रकरण पाचवे

# उपसंहार

प्रकरण पाचवे

# उपसंहार

५.१ प्रास्ताविक

५.२ सारांश

५.३ प्रमुख निष्कर्ष

प्रकरण पाचवे

# उपसंहार

## ५.१ प्रास्ताविक -

कराड शहराला मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. राजकीय, सांस्कृतिक, धार्मिक, सामाजिक अशा सर्वांगाने नटलेला हा मुलूख आहे. आज ज्याला कराड असे म्हणतात त्याचा जुना उल्लेख करहकर, करहाकडक, करहाडक, करहाटक, करहाट, करहाड व करहड अशा नावांनी ताम्रपट शिलालेख व महाभारतात सापडतो. कृष्णा आणि कोयना या बारमाही वाहणाऱ्या दोन नद्यांच्या संगमामुळे पवित्र आणि सुजलाम-सुफलाम बनलेल्या या शहराचे स्थान नेहमीच उल्लेखनीय ठरले. कराड शहरावर अनेक राजघराण्यांनी राज्य केले आहे. अशा सर्व क्षेत्रात आघाडीवर असलेल्या शहराच्या आसपास निर्माण झालेल्या कराड ग्रामीण या अधांतरी किंवा त्रिशंकू भागाचा सर्वांगीण अभ्यास करणे हा या शोध प्रबंधाचा हेतू आहे.

कराड शहराच्या आजूबाजूला अनेक वस्त्या, वसाहती निर्माण होत गेल्या. काळाच्या ओघात आणि मानवी नैसर्गिक प्रवृत्ती आणि नियंत्रणाअभावी त्या अनिर्बंध आणि अनियंत्रीत बनल्या. त्यातूनच बकाल आणि ओंगाळवाण्या झोपडपट्टीवजा वस्त्या, वसाहतींचा जन्म झाला आणि त्यातील मानवी जीवन असुरक्षित व अस्थिर बनले. हा परिसर कोणत्याही ग्रामपंचायत किंवा शहर हद्दीत नसल्याने विकास व नियंत्रणाला जबाबदार कोणीच नसल्याने या वस्त्यांचे स्वरूप अधिकच बिभत्स बनत गेले. शिक्षणाचा अभाव, बेकारी, व्यसनाधिनता, गुन्हेगारी या सर्व गोष्टी येथे मुळ धरू लागल्या आणि त्यातूनच अनेक समस्या निर्माण झाल्या. या सर्व बाबी व उपाययोजना यांचा समावेश प्रस्तुत प्रबंधात केलेला आहे.

## ५.२ सारांश -

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये नागरीकरण या संकल्पनेच्या सैद्धांतिक बाजूचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये प्रथम संशोधनाचा हेतू स्पष्ट केलेला आहे. कराड ग्रामीण हा भाग कसा निर्माण झाला? सदरचा भाग नगरपालिका हद्दीमध्ये समाविष्ट होण्यासाठी नगरपालिकेने केलेले प्रयत्न, हा परिसर वसत असताना कराड नगरपरिषद, जिल्हा परिषद, पंचायत समिती, तसेच लोकप्रतिनिधींच्या विकास निधीतून कसा व किती विकास झाला? कराडच्या राजकारणाचा नेमका कोणता परिणाम या परिसरावर झाला? या परिसरातील सर्व समस्या शोधून काढून त्याची कारणे व उपाय सांगणे हा संशोधनाचा हेतू येथे स्पष्ट केला आहे.

यानंतर प्रस्तुत शोध प्रबंधाची संशोधन पद्धती विशद केली आहे. यामध्ये या परिसरातील समस्या शोधून त्यावर उपाययोजना करण्यासाठी अर्थात संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. विविध शासकीय कार्यालयांचे अहवाल, ठराव इ. साधने तसेच वर्तमानपत्रातील बातम्या, राजकीय कार्यकर्ते, नेते, समाजसेवक, प्रशासकीय अधिकारी यांच्या मुलाखती अशा प्रथम व दुय्यम साधनांचा वापर करणेत आला आहे.

नागरीकरण ही वैश्विक प्रक्रिया आहे. त्याचे स्वरूप आणि परिणाम थोडयाफार फरकाने सर्व ठिकाणी सारखेच दिसून येतात. नागरीकरण म्हणजे काय? ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ आणि या विषयातील तज्ज्ञ अभ्यासक आणि शास्त्रज्ञ यांच्या व्याख्या, स्पष्टीकरणे, आणि त्यांची भूमिका मांडलेली आहे. नागरीकरणाचे परिणामदेखील जगामध्ये सर्व ठिकाणी थोड्याफार फरकाने सारखेच दिसतात. त्यामुळे नागरीकरणाच्या प्रक्रियेमध्ये जागतिक मानवी समुदायावर कोणते परिणाम झाले याचा अभ्यास या प्रकरणामध्ये केलेला आहे. नागरीकरण आणि नागरीकरणाचे मानवी जीवनावरील परिणाम असा सैद्धांतीक भाग या प्रकरणात

अभ्यासला आहे. या प्रबंधातील दुसरे प्रकरण कराड ग्रामीण भगातील नागरी समस्या असा आहे. या प्रकरणामध्ये सुरूवातीला कराड ग्रामीण भागातील लोकसंख्येची रचना व स्वरूप दिलेले आहे. यामध्ये या परिसरात एकूण वस्त्या, वसाहती किती आहेत, त्यातील लोकसंख्या किती आहे? या एकूण लोकसंख्येत स्त्री व पुरूषांचे प्रमाण किती आहे, येथील लोकांचे राहणीमान व जीवनमान कसे आहे याचा अभ्यास केलेला आहे. या परिसराची व्याप्ती किती आहे याचा उल्लेख केलेला आहे. यातील लोकसंख्येचे स्वरूप स्पष्ट करताना २००१ सालची जनगणना गृहीत धरलेली आहे. त्या पुढील भागामध्ये कराड शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी दिलेली आहे. कराड शहराला हजारो वर्षांची ऐतिहासिक, राजकीय, सांस्कृतिक व धार्मिक पार्श्वभूमी आहे. इ.स. १८५५ साली कराडमध्ये इंग्रजांनी नगरपालिकेची स्थापना केली. आज त्याला १५० वर्षे पूर्ण होवून गेली. अशा कराड शहराच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास येथे केलेला आहे.

प्रकरणाच्या पुढील भागात कराड ग्रामीणचे भौगोलिक स्थान नेमके कोणते याचा शोध घेतला आहे. त्यानंतर कराड ग्रामीणला जन्माला घालणाऱ्या वस्त्या-वसाहतींची एकूण माहिती दिलेली आहे. त्या पुढील भागामध्ये नागरीकरण व नगरपालिका तसेच शेजारील ग्रामपंचायत यांच्यातील वादाची कारणे नमूद केलेली आहेत. त्यानंतर कराड ग्रामीणचा उदय आणि विकास या भागाचा शोध घेतलेला आहे. कालौघात कराड परिसराचा आर्थिक चेहरामोहरा बदलत असताना कराड ग्रामीणचा भाग कसा विकसीत होत गेला याचा अभ्यास केलेला आहे. यापुढील भागात कराड ग्रामीण भागातील नागरी समस्यांचा शोध घेतलेला आहे. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभाव, शैक्षणिक समस्या, झोपडपट्टयांची समस्या, इ. समावेश होतो.

या प्रबंधाकरिता संशोधन करीत असताना या परिसराचा विकास व अधोगती या सर्व बाबींचा व त्यांना जबाबदार गोष्टींचा अभ्यास या प्रकरणात केलेला आहे.

सुरूवातीला कराड ग्रामीणमधील समस्यांचे स्वरूप दिलेले आहे. यामध्येच समस्या सांगून त्या दूर करण्यासाठी विविध लोकप्रतिनिधींचा स्थानिक विकास निधी, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून परिसराचा विकास कसा व किती झाला याचा शोध घेतलेला आहे. त्यानंतर हा परिसर कराड नगरपरिषद हद्दीमध्ये समाविष्ट करण्यासाठी झालेल्या राजकारणाची माहिती दिलेली आहे. तसेच पुढच्या भागामध्ये हा परिसर कराड शहर हद्दीमध्ये समावेशाच्या विरोधाचे राजकारण याचा इत्यंभूत अभ्यास करणेत आलेला आहे.

हा परिसर कराड उत्तर विधानसभा मतदारसंघात येतो. विधानसभा निवडणूकीमध्ये विकासाच्या बाबतीत आमदारांनी मांडलेल्या भूमिकेचे विस्तृत विवेचन केले आहे. तसेच या परिसराचा जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये प्रतिनिधीत्व करणाऱ्या प्रतिनिधींची नेमकी भूमिका काय आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानंतर मलकापूर ग्रामपंचायतीची भूमिका या प्रकरणात महत्त्वाची असल्याने या ग्रामपंचायतीची या प्रकरणातील विचार व भूमिका तपासण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यानंतर या परिसराच्या कराड शहर हद्दीत समावेशाकरिता जो अडचणीचा मुद्दा आहे तो म्हणजे संबंधित १२ सर्व्हे नंबर्स होय. या भागामध्ये या १२ सर्व्हे नंबर्समधील नागरीकांच्या भूमिकेवर अभ्यास केलेला आहे. पंचायत समिती, जिल्हा परिषद, कराड नगरपालिका, आमदार, खासदार यांच्या निधीतून झालेल्या विकास कामांची सखोल माहिती दिलेली आहे. त्यानंतर ग्रामीण भागातील नागरी सुविधांचा प्रश्न मांडलेला आहे. अशा पद्धतीने या प्रबंधातील प्रकरण तीनचे स्वरूप आहे.

प्रस्तुत प्रबंधाच्या चौथ्या भागामध्ये सुरूवातीला नागरीकरण व त्रिशंकू भागांचा प्रश्न यांचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये नागरीकरण ही वैश्विक बाब असून भारतातील किंबहुना कराड परिसरातील नागरीकरणाची प्रक्रिया पूर्ण होत असताना कोणकोणत्या गोष्टी घडल्या, त्याचे परिणाम कोणते झाले, नागरीकरणाचे स्वरूप कसे आहे याचा तौलनिक अभ्यास केला आहे. त्या पुढील भागामध्ये संपूर्ण जग

विकासाच्या आणि प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत असताना या विकास प्रक्रियेत त्रिशंकू भाग कसा दुर्लक्षिला जातो व त्याचे परिणाम तेथील मानवी जीवनावर कसे होतात याचा अभ्यास केलेला आहे. त्यापुढील भागामध्ये कराड ग्रामीण भागातील जो त्रिशंकू किंवा अधांतरी भाग आहे त्यातील नेमक्या समस्या कोणत्या आहेत व त्याला कारणीभूत घटक कोणकोणते आहेत याची कारणमीमांसा केलेली आहे. या परिसरातील समस्यांची कारणमीमांसा केल्यानंतर या समस्या सोडविण्यासाठी कोणकोणते उपाय करणे आवश्यक आहेत याचे विवेचन केले आहे.

## ५.३ प्रमुख निष्कर्ष -

आधुनिक काळात संपूर्ण जगामध्ये अनिवार्य आणि अपरिहार्य ठरलेली वैश्विक बाब म्हणजे नागरीभवन किंवा शहरीकरण होय. वाढती महागाई आणि बदलत्या काळात आपले दारिद्र्य नष्ट व्हावे, कुटुंबाच्या चरितार्थासाठी हमखास आणि खात्रीचे उत्पन्नाचे साधन मिळावे या अभिलाषेने खेड्यापाड्यातील लोक शहरी मृगजळाच्या मागे धावत शहरात येऊन पोहोचले आणि तेथूनच त्यांच्या आणि शहरांच्या दुर्भाग्याला सुरूवात झाली. झोपडपट्ट्या, गलिच्छ वस्त्या आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या अनेक समस्यांचा जणू पेव फुटला. बघता बघता या समस्यांनी गंभीर आणि रौद्र रूप धारण केले. सरकारनेदेखील ही बाब म्हणावी तेवढी गांभीर्याने घेतली नाही. त्यामुळे या समस्यांच्या धगीत गरीब आणि सामान्य माणूस होरपळत राहिला.

कराड ग्रामीण म्हणून ओळखला जाणारा अधांतरी किंवा त्रिशंकू भागदेखील याला अपवाद ठरलेला नाही. या शोध प्रबंधाच्या माध्यमातून या परिसराची पाहणी, निरीक्षण, भेटी, लोकांशी संवाद, लोकप्रतिनिधींशी मुलाखत, स्थानिक समाजसेवी कार्यकर्ते व वृत्तपत्रे तसेच पक्षीय राजकारणाची दिशा या सर्वांचा सखोल अभ्यास करण्याची संधी प्राप्त झाली. त्यातून त्या परिसरातील लोकांची राहणी, विचार, समस्या, इच्छा अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या लोकांच्या जखमांवर फुंकर घालण्यासाठी शासनाने, कराड नगरपालिकेने आणि लोकप्रतिनिधींनी केलेल्या कामाचा

अभ्यास करता आला. त्यामुळेच प्रस्तुत प्रबंधाचे शोधकार्य सखोल, व्यापक, तरीही मुद्देसूद पद्धतीने करता आला.

स्थानिक स्वराज्य संस्थांचा जनक म्हणून लॉर्ड रिपन याला ओळखले जाते. प्रत्येक नागरीकाचा जास्तीत जास्त विकास व्हावा हाच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्थापनेचा हेतू आहे. परंतु भारतीय स्वातंत्र्याची साठी ओलांडतानासुद्धा या स्थनिक स्वराज्य संस्थांची तळागाळापर्यंत स्थापनाच होवू नये आणि त्यामुळे देशभरातील कोट्यावधी नागरीक गैरसोई आणि असुरक्षिततेच्या वणव्यात होरपळली जावीत हे भारतीय लोकशाही व्यवस्थेला जेवढे कलंकीत करते तेवढेच अराजकता आणि प्रक्षोभाला निमंत्रीत करते.

त्रिशंकू भागांची समस्या ही राष्ट्रीय स्वरूपाची आहे, त्याचे स्वरूप व गांभीर्य पाहून राज्य शासन आणि केंद्र शासनाने अतिशय व्यापक, प्रभावी आणि दूरदृष्टी ठेवून धोरणे ठरवावीत. पंचवार्षिक योजनांप्रमाणे कालबद्ध कार्यक्रम आखून या भागांचा विकास करण्यासाठी खंबीरपणे पाऊले उचलली पाहिजेत.

कराड ग्रामीणचा प्रश्नसुद्धा त्यापेक्षा वेगळया पद्धतीचा नाही. हा परिसर कराड शहर हद्दीत समाविष्ट व्हावा म्हणून नगरपालिका जर १९६१ पासून सुमारे ४५ वर्षे प्रयत्न करीत असेल आणि तरीही त्यात यश मिळत नसेल व भविष्यकाळात हा प्रश्न कधी सुटेल याबाबतीत अनिश्चितता असेल आणि तोपर्यंत हा परिसर आणि त्यातील लोक या बजबजपूरीत निर्दयपणे आपले जीवन जगणार असतील असे चित्र असेल तर हा परिसर नगरपालिका हद्दीमध्ये समावेश करण्याच्या प्रक्रियेबद्धल प्रश्नचिन्ह उभे राहते. किंबहुना हा परिसर कराड शहर हद्दीत समावेश करण्याचा मार्ग गैरलागू ठरतो.

दुसरा मार्ग म्हणजे या परिसरामध्ये स्वतंत्र महसुली गावाची स्थापना करून स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करणे होय. मार्ग कोणताही स्वीकारला तरी तो लवकरात लवकर अंमलात आणणे हे महत्त्वाचे आहे. जर नजीकच्या काळात किंवा लवकरात लवकर या परिसरामध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन होत असेल तर तो मार्ग

योग्य वाटतो. कारण या माध्यमातून या भागाचा विकास करण्यासाठी जबाबदार यंत्रणा निर्माण होईल. त्या अनुषंगाने राजकारण निर्माण होईल, जबाबदार लोकप्रतिनिधी तयार होतील. ग्रामपंचायतीची सत्ता तेथील स्थानिक प्रतिनिधींच्या हातात आल्यामुळे ते अधिक जबाबदारीने आपली भूमिका पार पाडतील. ग्रामपंचायतींचे कर आणि महसूल, पाणीपट्टी, वीज बील इ. कमी प्रमाणात असते. त्यामुळे तो भरणे नागरीकांना सुसह्य होईल आणि लोक या स्थानिक स्वराज्य संस्थेला चांगला प्रतिसाद देतील व स्वीकारतील.

नव्याने निर्माण झालेल्या ग्रामपंचायत हद्दीमधील घरांना घरपट्टी व इतर कर अतिशय कमी प्रमाणात असतात व त्याची वाढ हळूहळू टप्प्याटप्प्याने होत असते. अशी हळूहळू होणारी नैसर्गिक वाढ लोक स्वीकारतील या माध्यमातून त्यांना अधिकचा भूर्दंड पडणार नाही. इथल्या लोकांचे स्वतंत्र राजकीय अस्तित्व निर्माण होईल. राजकीय स्थिरता आणि एकजिनसीपणा निर्माण होऊन हा भाग विकासाच्या प्रवाहात येईल. अलिकडे पंचायत राज्य व्यवस्थेमुळे शासनाकडून येणारी मदत थेट ग्रामपंचायतीत येते. विकासाला पुरेपूर पैसा मिळतो.

स्वतंत्र राजकीय अस्तित्व आणि एकजीनसी राजकीय समुदाय निर्माण झाल्यामुळे दबावाचे राजकारण करणे सोईचे बनते व त्या अनुषंगाने परिसराच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यक असलेली राजकीय मजल मारता येते. या सर्व बाबींचा साकल्याने व तटस्थपणे अभ्यास केल्यास एका गोष्टीची खातरजमा होते, ती म्हणजे या परिसराचा विकास करण्यासाठी स्वतंत्र स्थानिक स्वराज्य संस्थेशिवाय दुसरा योग्य मार्ग आढळत नाही.